# पुणे महानगरपालिका
## क्रीडा शिष्यवृत्ती, सन २०२५ -२०२६
## सन २०२६ -२०२७
## जाहीर प्रकटन

पुणे शहरातील जे खेळाडू जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करून प्राविण्य मिळवितात अशा खेळाडूंना पुणे महानगरपालिकेकडून क्रीडा धोरण २०१८ नुसार प्रतिवर्षी क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येते. सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या कालावधीतील क्रीडा शिष्यवृत्ती खेळाडूंना देय असल्याने याबाबत खालील जाहीर प्रकटन देण्यात येत आहे.

खालील नमूद मागील दोन वर्षाची खेळाडूंची कामगिरी लक्षात घेऊन मान्यताप्राप्त क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंकडून पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा धोरण २०१८ मधील अटी व शर्तीस अधीन राहून क्रीडा शिष्यवृत्ती देणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | वर्ष | शिष्यवृत्ती करीता ग्राह्य धरण्यात येणारा कालावधी |
|---|---|---|
| १. | सन २०२५-२६ | १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४<br>व<br>१ एप्रिल २०२४ – ३१ मार्च २०२५ |
| २. | सन २०२६-२७ | १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५<br>व<br>१ एप्रिल २०२५ – ३१ मार्च २०२६ |

क्रीडा शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या खेळाडूंनी कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आपले अर्ज विहित नमुन्यात व विहित कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक आहे. खेळाडूंनी खालील नमूद केलेल्या कालावधीत आपले अर्ज व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांसह क्रीडा विभाग, पंडित नेहरू स्टेडीयम, स्वारगेट येथे दाखल करावेत.

छापील अर्जाचा नमुना व योजनेबाबत अटी- शर्ती, नियम, निवड प्रक्रिया ई. ची सविस्तर माहिती पुणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ https://www.pmc.gov.in वर उपलब्ध आहे. तसेच याबाबतची अधिक माहिती क्रीडा विभाग, पुणे मनपा पंडित नेहरू स्टेडीयम, स्वारगेट पुणे - ०२ यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

अर्ज उपलब्ध होण्याचा कालावधी (ONLINE व OFFLINE) दि. २९/०६/२०२६ ते १५/०७/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत. (कार्यालयीन सुट्टी सोडून)

अर्ज स्विकार करण्याचा कालावधी दि. २९/०६/२०२६ ते १५/०७/२०२६ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत. (कार्यालयीन सुट्टी सोडून)

Scanned with OKEN Scanner

**अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे –**

१. अर्ज सादर करण्याच्या दिनांकाच्या मागील ५ वर्षे पुणे महानगरपालिका हद्दीतील वास्तव्य असल्याचा पुरावा. ( मिळकतकर पावती, लाईट बिल, पासपोर्ट यापैकी कोणताही एक पुरावा)

२. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला उत्पनाचा दाखला ( कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न र.रु.७ लाखापेक्षा कमी असणे आवश्यक)

३. मान्यताप्राप्त शासनमान्य जिल्हा क्रीडा संघटनेचे शिफारसपत्र.

४. वरील नमूद वर्षानुसार प्राविण्य प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**टीप –**

१. सन २०२४-२५ साली ज्यांना क्रीडा शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. अशा खेळाडूंनी सन २०२५-२६ या कालावधीसाठी अर्ज करू नये. त्यांनी केवळ सन २०२६ -२७ कालावधीसाठी अर्ज करावा.

२. अपूर्ण माहिती भरलेला /अपूर्ण कागदपत्रे असलेला अर्ज अपात्र करण्यात येईल.

३. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२३/६

(डॉ. संतोष टेंगले)
उप आयुक्त (क्रीडा)
पुणे महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# उदयोन्मुख खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती देणेबाबत

पुणे शहरात कायम वास्तव्य असणाऱ्या एखाद्या खेळाडूने किंवा संघाने राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पुणे शहराचे नाव उज्वल किंवा नाव लौकिकात भर घातली असल्यास त्याला पुणे महानगरपालिकेच्या वतीने पुढील स्पर्धेच्या सरावासाठी, क्रीडा साहित्य खरेदीसाठी खालील अटी-शर्तीस अधिन राहून प्रतिवर्षी क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येईल.

अटी व शर्ती :-

१. अर्ज सादर करणाऱ्या खेळाडूचे पुणे महानगरपालिका हद्दीतील वास्तव्य अर्ज सादर करण्याच्या दिनांकाच्या मागील ५ वर्षे असणे आवश्यक आहे. ( मिळकतकर पावती, लाईट बिल, पासपोर्ट यापैकी कोणताही एक पुरावा)

२. शालेय, विद्यापीठ स्तरावरील स्पर्धा शासनमान्य असणे आवश्यक आहे.

३. खुल्या गटातील स्पर्धा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन व राष्ट्रीय स्पर्धा असल्यास इंडियन ऑलिंपिक असोसिएशन यांनी मान्य केलेल्या अधिकृत खेळ/स्पर्धांच ग्राह्य धरल्या जातील.

४. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडील मान्यताप्राप्त खेळांच्या स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त खेळाडूंनाच क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येईल.

५. क्रीडा मंडळे, संस्था, निमशासकीय संस्था, मान्यताप्राप्त नसलेल्या जिल्हा/राज्य क्रीडा संघटना यांनी आयोजित केलेल्या स्पर्धामधील प्रमाणपत्रे क्रीडा शिष्यवृत्तीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

६. संबंधित खेळाच्या मान्यताप्राप्त शासनमान्य जिल्हा क्रीडा संघटनेचे शिफारसपत्र.

७. खालील कोष्टकामध्ये नमूद केलेल्या अ,ब,क,ड स्तरावर खेळाडूने प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवणे आवश्यक आहे. याबाबतची प्राप्त प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. क्रीडा शिष्यवृत्ती अथवा खेळाडू अर्थसहाय्य या योजनेत कोष्टकामध्ये नमूद केलेल्या अनुदाना इतकीच रक्कम मंजुर करता येईल.

| अ.क्र. | स्पर्धा स्तर | क्रीडा शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|
| | शालेय / विद्यापीठ | |
| अ | शहर/जिल्हा | १०,०००/- |
| ब | विभागीय स्तर | १५,०००/- |
| क | राज्यस्तरीय | २०,०००/- |
| ड | राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय | ३०,०००/- |
| | खुला | |
| अ | शहर/जिल्हा | २०,०००/- |
| ब | विभागीय स्तर | २५,०००/- |
| क | राज्यस्तरीय | ३०,०००/- |
| ड | राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय | ५०,०००/- |

Scanned with OKEN Scanner

९. वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रूपये ७,००,०००/- पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अर्जासोबत सक्षम अधिकाऱ्याचा रक्कम रुपये ७,००,०००/- पेक्षा कमी असल्याबाबतचा दाखला (उत्पन्नाचा दाखला) जोडणे आवश्यक आहे.

१०. क्रीडा शिष्यवृत्ती मागणी करणाऱ्या खेळाडूंची सध्या सुरु असलेल्या वर्षाच्या मागील सलग दोन वर्षाची कारकीर्द तपासली जाईल.

११. खेळाडूने एका पेक्षा अधिक खेळामध्ये जरी प्राविण्य प्राप्त केलेले असेल तरी देखील त्यास एकाच खेळाकरीता शिष्यवृत्तीचा लाभ देय असेल. प्रत्येक खेळाकरीता वेगळी शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.

१२. वरील अटी व नियम यात बदल करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त व मा.क्रीडा समिती यांचेकडे राहतील.

१३. क्रीडा शिष्यवृत्ती अथवा खेळाडू अर्थसहाय्य या योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या खेळांडूकरीता अर्जाचा नमूना परिशिष्ट 'अ' प्रमाणे असेल.

(डॉ. संतोष टेंगले)
उप आयुक्त (क्रीडा)
पुणे महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट 'अ'

अर्ज क्र.

| अर्जदाराचा फोटो |
| --- |

पुणे महानगरपालिका

क्रीडा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अर्ज (उदयोन्मुख खेळाडूंकरीता)

मा. उप आयुक्त (क्रीडा)
पुणे महानगरपालिका
यांजकडेस सादर ..........

विषयः- क्रीडा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०___ - २० ___ करीता शिष्यवृत्ती मिळणेबाबत.

महोदय,

मी पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये राहत असून, पुणे महानगरपालिकेतील क्रीडा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत क्रीडा स्पर्धा सहभाग, सराव, क्रीडा साहित्य खरेदीसाठी क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेसाठी अर्ज करीत आहे.

१) खेळाडूचे /अर्जदाराचे नाव ( मराठीमध्ये) -----------------------------------------------------

खेळाडूचे /अर्जदाराचे नाव ( इंग्रजीमध्ये) -----------------------------------------------------

२) खेळाडूंचा संपूर्ण पत्ता ------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक :---------------------------------------------------------------------------------

३) मोबाईल क्रमांकः------------------------------------------------------------------------------------

४) आधार कार्ड क्रमांक---------------------------------------------------------------------------------

५) पुणे मनपा प्रभाग क्र. ---------------------------------------------------------------------------------

६) खेळाडूची जन्म तारीख :- / / वय ------------- वर्षे -------- महिने-----

७) खेळाडूची शैक्षणिक पात्रता :- ----------------------------------------------------------------------

८) पुणे मनपा वास्तव्य कालावधी :- ------------------------------------------------------------------

Scanned with OKEN Scanner

९) ज्या क्रीडा प्रकारामध्ये खेळाडूने भाग घेतलेला आहे त्याबाबतची माहिती :------------------

------------------------------------------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| अ. खेळाचा प्रकार:- | |
| ब. खुल्या गटातील क्रीडा स्पर्धा:- | |
| क. इतर गटातील क्रीडा प्रकारामध्ये शहर / जिल्हा /राज्यस्तरीय/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये प्राप्त क्रमांक | |
| ड. शालेय गटातील क्रीडा स्पर्धा:- | |
| इ :- शालेय गटातील क्रीडा प्रकारामध्ये शहर/ जिल्हा/ राज्यस्तरीय/ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये प्राप्त क्रमांक :- | |

खेळाडूची क्रीडा विषय माहिती (आवश्यक असल्यास सोबत वेगळे पान जोडावे) सर्व वरिष्ठ व कनिष्ठ स्पर्धा निमंत्रित स्पर्धा ग्राह्य धरल्या जाणार नाही.

| स्पर्धा स्तर | कालावधी | मिळालेली पदके |
|---|---|---|
| जिल्हा स्तरावरील | | |
| राज्य स्तरावरील | | |
| राष्ट्रीय स्तरावरील | | |
| आंतरराष्ट्रीय स्तरावरील | | |

१. खेळाडू स्वतः कमविता असल्यास/ नसल्यास वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रुपये..........................

२. संबंधित जिल्हा क्रीडा संस्था, महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन, व राष्ट्रीय स्पर्धा असल्यास इंडियन ऑलिंपिक असोसिएशन व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजकांनी निवड केले बाबतचे पत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. संस्थेची शिफारसः- आहे/नाही.

Scanned with OKEN Scanner

मी.......................................................................हमी देतो / देते की, उपरोक्त विनंती केल्यानुसार क्रीडा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत स्वतः अर्ज केलेला आहे. उपरोक्त दिलेली माहिती ही खरी असून सदर माहिती खोटी आढळल्यास माझा/माझे पाल्याचा अर्ज रद्द होईल याची मला जाणीव आहे. उपरोक्त अर्जामध्ये नमूद केलेल्या क्रीडा स्पर्धेसाठी मला पुणे महानगरपालिकेकडून चालू आर्थिक वर्षात कोणत्याही स्वरूपाचे अर्थसहाय्य मिळालेले नाही. तसेच मी अथवा माझे पाल्याकडून पुणे महानगरपालिकेमार्फत चालू आर्थिक वर्षात अर्थसहाय्य मिळविणेसाठी अर्ज केलेला नाही.

तरी मला पुणे महानगरपालिकेकडून क्रीडा शिष्यवृत्ती मिळावी ही विनंती.

आपला/आपली

पुणे :-

दिनांक :-

स्वाक्षरी.................................

खेळाडूचे नाव...........................

-: कार्यालयीन वापरासाठी:-

१. अर्ज प्राप्त दिनांक :- -------/------/-------

२. अर्जदाराचे अर्ज प्राप्त करून घेणाऱ्याचे नावः----------------------------------------------------

हुद्दा--------------------------स्वाक्षरी---------------------

३. अर्जदाराचा अर्ज तपासणी केला असता पात्र/अपात्र बाबत शेरा---------------------------------

४. अर्जदाराचा अर्ज पात्र असून क्रीडा शिष्यवृत्ती अथवा खेळाडू अर्थसहाय्य देण्यास शिफारस आहे / नाही.

क्रीडा अधिकारी
पुणे महानगरपालिका

उप आयुक्त (क्रीडा)
पुणे महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner